जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/०६/२०२३
## दि.२८/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३२०/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ६५ वर्षे,रा.विमाननगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०६/२०२३ रोजी सकाळी ०६/४५ वा. लेन नं.१,सर्व्हे नं.२३५,संजय पार्क,विमाननगर,पुणे रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया प्रभातफेरी मारण्यासाठी पायी जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना पत्ता विचारण्याचा बहाणा करून,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मिनी गंठन ७५,०००/- रुपये किमतीचे जबरी चोरी करून नेले आहे. (फिर्यादी यांचा मुलगा हॉस्पीटल येथे ॲडमीट असल्याने,त्यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.कोल्लुरे ९४२१६७२९५९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे १६१/२०२३,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | विनोद कदम,वय-४२ वर्षे,रा.गोकुळनगर,धानोरी रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०६/२०२३ रोजी दुपारी १३/०० वा ते १६/०० वा.चे दरम्यान फ्लॅट क्र.२,प्लॉट क्र.०८,गुडविल शिवम सोसायटी,गोकुळनगर,धानोरी रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील लाकडी कपाटाचे ड्रॉवर मधुन २,७०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने दिवसा घरफोडी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चव्हाण ०२०/२६६८२५९० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३२२/२०२३,भादविक ३०४(अ),मो.वा.का.कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अरविंद राठोड,वय-३५ वर्षे,रा.इंदिरानगर,लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | पंडित चिमा सुर्वे,वय-४० वर्षे,रा.तांबे वस्ती,बावडी,वाघोली,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०६/२०२३ रोजी दुपारी १४/०० ते १४/३० वा.चे दरम्यान गिताई लॉन्स ते भारत पेट्रोल पंपाचे मध्ये रोडवर,साठे वस्ती,लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ उदल बद्रि राठोड,वय-३२ वर्षे रा.धानोरी जकात नाका,लोहगाव,पुणे हा मोटार सायकलवरून राहते घरी जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार यांस समोरून जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, व्ही.एम.चंदन ८२७५५२२६९७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ४२०/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३८,३३७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | राजकुमार गव्हाणे,वय-३८,रा.होले कॉम्प्लेक्स,ऊरळी-कांचन,पुणे |
| **आरोपीत** | अमरजित सुख्खु निषाद,वय-३५,रा.उत्तर प्रदेश (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०६/२०२३ रोजी ०७/५० वा.सोलापुर-पुणे रोडवरील नायगाव फाटा,हवेली,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील यातील फिर्यादी हे त्यांची पत्नी सौ.योगिता,वय-३६ व मुलगी सुरेखा,वय-१६ वर्षे यांचेसह मोटार सायकलवरुन जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टँकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांची पत्नी ही चालवित असलेल्या मोपेडला पाठीमागुन उजव्या बाजुस धडक देवुन,सौ.योगिता हिचे डोक्यास गंभीर दुखापत करुन तीचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. देशमुख ९४२०२५३१४० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९३८/२०२३,भादविक ३७९,३२८ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६५ वर्षे,रा.न्यु नाना पेठ,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी प्रवासी इसम वय अंदाजे ३०-४० वष,सडपातळ,अंगात फिकट गुलाबी रंगाचा फुल शर्ट-फुल पँट काळया रंगाची,काळा रंगाचा मास्क लावलेला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/६/२०२३ रोजी दुपारी १३/३५ वा.ते १४/४५ वा.चे दरम्यान सहयाद्री हॉस्पीटल मेन गेटच्या बाहेर हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची स्वतःच्या मालकिची रिक्षा असुन,त्यांची रिक्षा नानापेठ व कॅम्प परिसरा मध्ये चालवित असतात. फिर्यादी हे त्यांची रिक्षा बुधानी कॉर्नर,अरोरा टॉवर समोर एम.जी.रोड,पुणे येथे थांबुन पॅसेंजरची वाट पाहत असताना,नमुद वर्णनाचे अनोळखी इसमाने फिर्यादी जवळ येवुन,त्यांना पेशंटला घेवुन हडपसर येथे जायचे आहे असे सांगुन,तेथुन सहयाद्री हॉस्पीटल मेन गेटच्या बाहेर रिक्षा थांबवुन,फिर्यादी यांना फळांच्या रसाचे ज्युस मध्ये गुंगीचे औषध देवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन व हाता मधील दोन अंगठया असा एकुण २,०७,०००/- रू किचे दागिने चोरी करून घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, चेतन थोरबोले ८३०८४४४१०० |

## दि.२९/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९४१/२०२३,भादविक ३९२,४२७,३४,५०६,शस्त्र अधिनियम कलम (४),२५,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५,क्रिमिनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट कलम ३,७, |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३४ वर्षे,रा.मांजरी बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०६/२०२३ रोजी १८/४० वा.चैतन्य स्वीटस् ॲण्ड स्नॅक्स सेंटर,तळमजला,रुक्मिणी कॉम्पलेक्स, शेवाळवाडी फाटा,मांजरी बुद्रुक,मांजरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे रुक्मिणी कॉम्पलेक्स,शेवाळवाडी फाटा,मांजरी बुद्रुक,मांजरी,पुणे येथे चैतन्य स्वीटस् ॲण्ड स्नॅक्स सेंटर नावाचे दुकान असुन,ते त्यांचे दुकानात हजर असताना,यातील नमुद इसमांनी त्यांचे दुकानात येवुन,फिर्यादी यांचे दुकानातील कॅश काऊंटर तसेच दुकानातील इतर मिठाईचे काऊंटर,चार फ्रिजर,कोल्ड्रींग फ्रिज,दुकानातील शो-केस व दुकानाच्या बाहेर असलेले नाष्टा काऊन्टरच्या काचा हाता तील धारदार शस्त्राने फोडुन,नाष्टा काऊन्टर मधील रोख रक्कम २,०००/- रुपये जबरी चोरी करून, त्यांच्या हातातील धारदार शस्त्रे हे हवेत फिरवुन,खबरदार कोणी मध्ये आलातर,कोणालाही जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नानासाहेब जाधव ९८७०३८०२३७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**